**पंतप्रधानांनी अदिस अबाबा येथील अदवा विजय स्मारकावर वाहिली आदरांजली**

17 डिसेंबर 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज अदिस अबाबा येथील अदवा विजय स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. हे स्मारक 1896 साली अदवा युद्धात आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वासाठी सर्वोच्च बलिदान दिलेल्या शूर इथिओपियन सैनिकांना समर्पित आहे. हे स्मारक अदवा योद्ध्यांच्या अमर आत्म्यांना आणि देशाच्या स्वातंत्र्य, सन्मान आणि जिद्दीच्या गौरवशाली वारशाला आदरांजली आहे.

2. पंतप्रधानांच्या या स्मारक भेटीद्वारे भारत आणि इथिओपिया यांच्यातील एक विशेष ऐतिहासिक संबंध अधोरेखित होतो, जे दोन्ही देशांच्या लोकांकडून सदैव सन्मानपूर्वक जपले जात आहेत.

ॲडिस अबाबा

17 डिसेंबर 2025